# मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

## मशिन्स किरायाने घेणे करिता दरपत्रक सुचना क्रमांक १०७/२००९-१०

मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत जालना, बदनापूर व औरंगाबाद या ठिकाणी आवश्यकतेनुसार विविध कामांसाठी खालील मशीन्स भाडे तत्वावर वापरणे आहे. विद्यापीठ अभियंता त्यासाठी मशीन मालकांकडून, नोंदणीकृत कंत्राटदाराकडून दिनांक २१.१.२०१०, १६.०० वाजेपर्यंत खालील मशीन वापरण्याच्या किरायाची दरपत्रके मागवित आहेत. दरपत्रके शक्य झाल्यास त्याच दिवशी १६.३० वाजता उघडण्यात येतील.

खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे प्रत्येक ठिकाणाकरीता स्वतंत्रपणे दरपत्रके दाखल करावत

ठिकाण : ------------------------------------------- (**जालना, बदनापूर व औरंगाबाद यापैकी एक नमुद करावे**)

| अ.क्र. | विवरण (मशीन प्रकार) | दर रु. | एकक |
|---|---|---|---|
| १ | एक्सकॅव्हेटर (जेसीबी मशीन) | | प्रति तास दर |
| २ | पोकलेन मशीन ई. एक्स इ ६०/७० | | प्रति तास दर |
| ३ | रस्ता दबाई यंत्र रोड रोलर आठ टन (आठ तासांचा एक दिवस व किमान एक दिवसाचे काम गृहित धरुन) | | प्रति दिवस दर |
| ४ | जॉन डिअर ट्रॅक्टर (लेव्हलर ब्लेड सहित) | | प्रति तास दर |

१) कामाची अंदाजीत किंमती औरंगाबाद रु. १५.०० लक्ष, बदनापूर रु. १०.०० लक्ष व जालना रु. ५.०० लक्ष, त्या-त्या ठिकाणी निधी उपलब्ध झाल्यास. सदर काम एकाच वेळी किंवा सलग करण्याचे नसुन निधी उपलब्धतेप्रमाणे करण्यात येइल. **(कामाच्या किंमतीचे प्रमाण जेसीबी १५ टक्के काम, पोकलेन १० टक्के काम, रोड रोलर ५ टक्के काम व जॉन डिअर ट्रॅक्टर ७० टक्के काम)** २) इसारा रक्कम एकत्रित रु. १०००/- ३) सुरक्षा अनामत रक्कम प्रति मशीन प्रकारासाठी रु. १५००/- ४) नमुद केलेला दर हा सर्व खर्च (चालक, इंधन, वंगण, भत्ते, दुरुस्ती, जाणे-येणे इत्यादी) व सर्व करांसहीत असावा. ५) दरपत्रकासोबत इसारा रक्कम विद्यापीठ अभियंता, मकृवि, परभणी यांचे नावे असलेल्या राष्ट्रीय बॅंकेच्या एफडीआर/सिडीआर/टीडीआर, कमीत कमी एक वर्षाच्या कालावधीच्या या स्वरुपात जोडावी ६) यशस्वी दरापत्रकधारकास सुरक्षा अनामत रक्कम एफडीआर/सीडीआर या स्वरुपात जमा करुन रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करार करावा लागेल अन्यथा इसारा रक्कम जप्त करण्यात येईल. ७) वेळेवर मशीन पुरवून काम न केल्यास किंवा अर्धवट सोडल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. ८) मशीन वापराचे स्वतंत्र लॉगबुक मध्ये नोंदणी करुन वापरलेल्या तासाचे किराया देण्यात येईल त्या व्यतीरिक्त कोणतीही रक्कम देय राहणार नाही. ९) कोणतेही एक/अनेक किंवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा किंवा नाकरणेचा अधिकार विद्यापीठाने राखुन ठेवलेला आहे. १०) नमुद केलेले दर ३१.८.२०१० पर्यंत किंवा सध्याच्या डिझेल दरामध्ये १० टक्के पेक्षा कमी वाढ होईपर्यंतच लागु राहातील. डिझेल किमतीत १० टक्के पेक्षा जास्त वाढ झाल्यास दर बंधनकारक राहणार नाहीत.
**खास बाब : ११) दर मान्य झाले म्हणजे मशीन भाडयाने लावली जाईलच असे नाही. निधीची उपलब्धता, कामाची आवश्यकता, मंजूरी इ. बाबी बघुनच मशीन आवश्यक असल्यास किरायाने लावली जाईल.** १२) यशस्वी दरपत्रकधारकाने विद्यापीठाच्या मागणीप्रमाणे आवश्यक संख्येने मशीन्स किरायाने उपलब्ध करुन दिले पाहिजेत. आवश्यक तितक्या मशिन्स न पुरविल्यास इतरांच्या मशिन कामावर लावल्या जातील व त्याबाबत यशस्वी दरपत्रकधारकाची कोणतीही हरकत मान्य केली जाणार नाही.

विद्यापीठ अभियंता
मकृवि, परभणी

जा.क्र.सिईके-४/ /२०१०
दिनांक : १३.१.२०१०

प्रत :

१. नोटीस बोर्ड
२. दरपत्रक नांदेवही
३. भांडरपाल